महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
वनार्टी कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था
(वनार्टी), महाराष्ट्र राज्य,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर -४४००२२
Website : www.vanarti.in CIN: U84120MH2026NPL466492 ई-मेल :vanarti.info@gmail.com

जा .क्र. वनार्टी /नागपूर/आस्था/845/2026-27 दिनांक :-27/08/2026

# परिपत्रक

## स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांसाठी "मोफत मुलाखत कार्यशाळा आयोजित करण्याकरिता अर्ज मागविणेबाबत.

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) ही विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJ-NT) प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षणविषयक प्रगतीसाठी कार्यरत असलेली संस्था आहे. VJ-NT प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व प्रशिक्षण उपलब्ध करून देणे, तसेच स्पर्धा परीक्षेच्या मुलाखतीच्या टप्प्यावर उमेदवारांचा आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व, संवादकौशल्य व मुलाखत कौशल्य विकसित करणे या उद्देशाने **"मोफत मुलाखत कार्यशाळा"** आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

या अनुषंगाने **वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे** सेवाभावी तत्त्वावर **मोफत मुलाखत तयारी कार्यशाळा** आयोजित करण्याबाबत अनेक विद्यार्थ्यांकडून मागणी प्राप्त होत आहे. त्यानुषंगाने, उमेदवारांच्या हिताच्या दृष्टीने मुलाखत तयारी कार्यशाळा आयोजित करण्यास इच्छुक असलेल्या पात्र संस्था/संघटनांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

### कार्यशाळेचा उद्देश

1. स्पर्धा परीक्षेतील मुलाखतीसाठी उमेदवारांना प्रभावी मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.
2. मुलाखतीमध्ये विचारल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या प्रश्नांची माहिती देणे.
3. उमेदवारांचे व्यक्तिमत्त्व, संवादकौशल्य व सादरीकरण कौशल्य विकसित करणे.
4. मुलाखतीदरम्यान आत्मविश्वासाने व प्रभावीपणे उत्तरे देण्याचा सराव करून घेणे.
5. तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या माध्यमातून मुलाखतीतील अपेक्षा, शिष्टाचार व आवश्यक बाबी समजावून देणे.
6. प्रत्यक्ष **सराव मुलाखत** घेऊन उमेदवारांना मुलाखतीचा अनुभव उपलब्ध करून देणे.
7. VJ-NT प्रवर्गातील पात्र उमेदवारांना स्पर्धा परीक्षेच्या अंतिम टप्प्यासाठी आवश्यक प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.

## कार्यशाळेचे स्वरूप

कार्यशाळेमध्ये आवश्यकतेनुसार खालील बाबींचा समावेश करण्यात येईल :

1. मुलाखतीचे तंत्र व स्वरूप.
2. व्यक्तिमत्त्व विकास.
3. संवादकौशल्य व प्रभावी सादरीकरण.
4. मुलाखतीमध्ये विचारले जाणारे संभाव्य प्रश्न व त्यांचे स्वरूप.
5. चालू घडामोडी व सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नांची तयारी.
6. शैक्षणिक व व्यावसायिक पार्श्वभूमीवर आधारित प्रश्नांची तयारी.
7. मुलाखतीतील शिष्टाचार व आवश्यक बाबी.
8. तज्ज्ञांचे मार्गदर्शन व प्रश्नोत्तर सत्र.
9. प्रत्यक्ष Mock Interview / सराव मुलाखत.
10. उमेदवारांना वैयक्तिक मार्गदर्शन व अभिप्राय.

## अटी व शर्ती

1. कार्यशाळा पूर्णपणे **सेवाभावी तत्त्वावर व विनामूल्य** आयोजित करणे आवश्यक राहील.
2. कार्यशाळेचा मुख्य उद्देश स्पर्धा परीक्षा च्या मुलाखतीस पात्र उमेदवारांना मार्गदर्शन करणे हा असावा.
3. कार्यशाळेमध्ये अनुभवी व विषयतज्ज्ञ मार्गदर्शक, प्रशासकीय अधिकारी/तज्ज्ञ यांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.
4. इच्छुक संस्थेने कार्यशाळेचे नियोजन, कालावधी, ठिकाण, अपेक्षित विद्यार्थी संख्या व उपलब्ध तज्ज्ञ मार्गदर्शकांची माहिती प्रस्तावासोबत सादर करावी.
5. कार्यशाळेच्या आयोजनासाठी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारता येणार नाही.
6. संस्थेने कार्यशाळेचे आयोजन शिस्तबद्ध व पारदर्शक पद्धतीने करणे आवश्यक राहील.
7. कार्यशाळेच्या आयोजनाबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडे राहील.
8. संस्थेने प्रस्तावासोबत संस्थेची नोंदणी, कार्याचा अनुभव व यापूर्वी आयोजित केलेल्या अशा प्रकारच्या उपक्रमांची माहिती उपलब्ध असल्यास सादर करावी.

9. आवश्यकतेनुसार संस्थेकडून अतिरिक्त माहिती/कागदपत्रे मागविण्यात येऊ शकतात.

10. वरील अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक संस्थांनी आपला प्रस्ताव विहित कालावधीत सादर करावा.

**संपर्क**

इच्छुक संस्थांनी अधिक माहितीसाठी खालील ई-मेल आयडीवर प्रस्ताव पाठवावा किंवा दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

**ई-मेल :** www.vanartiinfo@gamil.com
**दूरध्वनी क्र.** : 7887882026

**प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख :** 30/08/2026

सदर आवाहनाचा लाभ जास्तीत जास्त पात्र उमेदवारांना मिळावा यासाठी संबंधित संस्था/संघटनांनी सहकार्य करावे.

**स्वा**
**प्रशांत वावगे**
**प्र. व्यवस्थापकीय संचालक**
**वसंतराव नाईक संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था, (वनार्टी)**